**माहितीचा अधिकार**

**स्पीड पोस्ट**

संकेतस्थळ : www.transport.maharashtra.gov.in
ई-मेल : dycommr.enf2@gmail.com
दूरध्वनी क्र. : ०२२-२६४१६४२५
फॅक्स क्र. : ०२२-२६४१४९०१
**परिवहन आयुक्त यांचे कार्यालय,**
प्रशासकीय इमारत,३ रा व ४ था मजला,
डॉ.आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत,
वांद्रे(पूर्व), मुंबई- ४०० ०५१.

माअमुमाअ.क्र. ३९८/प्र.क्र.२५-०५१७/कार्या-४(३)/पआका/२०१७/जा.क्र. 1089 दिनांक

**"माहिती/उत्तर पत्र"**

प्रति,
**श्री. रंजित गाडगीळ,**
रा. "यमुना" आय. सी. एस. कॉलनी,
गणेशखिंड रोड,
ता. पुणे. जि. पुणे.

**विषय :- मुळ माहितीचा अर्ज क्र. ३९८/२०१७.**
**(Road Safety Policy and Action Plan)**

**संदर्भ :-** १. माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम ६ (१) अन्वये माहिती मिळणेबाबतचा आपला दि. २०.०४.२०१७ रोजीचा **मुळ माहितीचा अर्ज** या कार्यालयाच्या जन माहिती अधिकारी, (कार्या-४) यांना प्राप्त दि. २६.०४.२०१७.

२. या कार्यालयाचे माअमुमाअ.क्र. ३९८/प्र.क्र.२५-०५१७/कार्या-४ (३)/ पआका /२०१७/ जा.क्र. १०२५, दिनांक ०६.०५.२०१७.

३. आपल्या कडून शासनास केलेल्या रु.१०४/-प्रदानाची पावती क्र. ०७१८१२८, दि.१८.०५.२०१७.

उपरोक्त विषय व संदर्भान्वये आपणांस कळविण्यात येते की, आपण मागणी केलेल्या मुद्दा क्रमांक ०१ ते ०३ माहिती, जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध नाही. आपण मागणी केलेल्या मुद्दा क्र. ०१ ते ०३ बाबत या कार्यालयाच्या कार्यासन - ४ अभिलेखावर उपलब्ध व **मानीव जन माहिती अधिकारी** यांचेकडून प्राप्त कागदपत्राच्या प्रती (पृष्ठ ०१ ते ३२) सोबत जोडल्या आहेत.

उपरोक्त माहितीने/उत्तराने आपले समाधान झाले नसल्यास आपणांस सदर पत्र प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) नुसार **श्री. दिनकर मनवर,** प्रथम अपिलीय अधिकारी तथा परिवहन उपायुक्त, (अंमल-२) महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ०५१ यांचेकडे उपरोक्त पत्त्यावर अपील दाखल करण्याची तरतुद आहे.

20.5.2017

**(शा. म. शेटे)**
**जन माहिती अधिकारी**
**तथा**
**सहाय्यक परिवहन आयुक्त (अंमल-२)**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**प्रत :-** माहितीस्तव.
१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा परिवहन उपायुक्त (अंमल-२) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा जनसंपर्क अधिकारी, परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई.

Received 25 May 2017

# Maharashtra State Road Safety Policy

The Ministry of Road Transport and Highways (MORTH) has formulated National Road Safety Policy bringing about a significant reduction in mortality and morbidity resulting from road accidents at national level.

Keeping the National Road Safety Policy in view and having regard to the local conditions prevalent in the State, the Government of Maharashtra hereby frames the Maharashtra State Road Safety Policy as under-

## I. **Preamble**

1) The Government is deeply concerned about the number of road accidents involving motor vehicles and resultant injuries and fatalities therefrom in recent years. The Government recognises that road accidents have now become a major public health issue, and the victims are mainly the poor and vulnerable road users.

2) The Government recognizes that following are the major factors contributing to road accidents :-
   - i) Unskilled Drivers
   - ii) Unfit vehicles
   - iii) Lack of effective enforcement
   - iv) Improper road design
   - v) Pedestrian behaviour, and
   - vi) Lack of coordinated efforts to take corrective measures amongst the concerned Government departments and other agencies.

   The Government further recognizes that all the stake holders have joint responsibility in reducing incidents of road accidents, injuries and fatalities.

3) In the light of the above, the Government, through this Maharashtra State Road Safety Policy, states its commitment to bring about a significant reduction in mortality and morbidity resulting from road accidents.

## II. Policy Statements

In order to achieve a significant improvement in road safety, the Transport Department of Government of Maharashtra shall act as the Apex Nodal Agency for implementation of this policy. In order to ensure effective implementation of this policy, the Government is committed to :-

### i) Enhance Qualities and Driving Skills of Motor Vehicle Drivers

In order to ensure that the prospective drivers of vehicles are thoroughly tested for their driving skills, the Government has started conducting driving test of candidates on the computerized driving test tracks available at the Central Institute of Road Transport (CIRT), Pune. The Government shall make all efforts to start setting up similar test tracks for conducting driving tests at all places in a phased manner. This measure will help bring only properly skilled drivers on the roads, thereby reducing their contribution to the road accidents

### ii) Conducting Proper Fitness Test On All Vehicles

The Government recognises that plying of defective vehicles contributes to road accidents. In recognition thereof, the Government has already initiated setting up an Automated Vehicle Fitness Centre for transport vehicles at Nashik. The Government has plans to set up atleast one such centre in each revenue division and subsequently increase their number in a phased manner, taking into consideration the vehicle population of the area. Though presently the annual fitness test is applicable only for transport vehicles, after gaining experience in this regard, the Government proposes to make it mandatory even for non-transport vehicles. This measure will help ensure that the fitness test will be conducted in a transparent and strict manner, thereby reducing its contribution to road accidents.

### iii) Effective on Road Enforcement of Legal Provisions

The Government recognizes that effective on road enforcement of various provisions under the Motor Vehicles Act and other concerned enactments goes in a long way to reduce the number of road accidents. The Government

recognizes that overloading of goods vehicles, drink and drive, over speeding and rash and negligent driving contribute to road accidents. In order to check overload of goods vehicles which lead to road accidents, the Government has set up modernized border check posts at 9 locations so far and has plans to complete remaining 13 border check posts by December 2015.

In order to ensure that the instances of drink and drive cases, over speeding and rash and negligent driving cases are reduced significantly, the Government proposes to strengthen the enforcement machinery by providing them with modern equipments, capacity building and support infrastructure.

**iv) Proper Road Design and Road Infrastructure**

The Government recognizes that improper and faulty road designs and lack of proper road infrastructure contribute to road accidents.

In recognition thereof the Transport Department shall coordinate the agencies involved in design, construction and maintenance of road such as Public Works Department, Local Self Government and Highway Authorities and take up mandatory periodical inspection of roads and ensure adequacy of proper road signage and take corrective measures wherever necessary. The Government shall endeavour to implement Intelligent Transport Systems (ITS) for achieving safe and efficient transport.

This measure will help to ensure that the roads are properly designed and maintained and as per the best standers in this regard provided with proper road signage, thereby reducing number of road accidents on this count.

**v) Creating Awareness on Road Safety**

The Government recognizes that many a times irresponsible road behaviour of pedestrian also contributes to road accidents. The Government further recognizes that there is a need to sensitize the pedestrians and other road users for observing basic road disciplines.

In order to ensure that the pedestrians and other road users are properly trained about observing roads etiquettes, the Government proposes to carry out sustained campaigns in this regard throughout the State, with the help of Department of Information and Publicity, Department of Primary Education and NGOs and shall use Audio, Video, Print and Press Media to spread the awareness.

The Government also recognizes that the road safety is required to be instilled and engrained in the minds of school and college going students who are road users and prospective vehicle drivers. The Government therefore proposes to make this aspect as a compulsory part of school syllabus.

**vi) Need to Make Coordinated Efforts in Achieving the Aim of Road Safety Amongst the Concerned Government Departments and Other Institutions / NGOs**

The Government recognizes that road safety involving the driver, vehicle and other road users is an issue which encompasses everybody from a child to an aged person. The Government also recognizes that the different agencies are working, many a times independent of each other in this regard.

The efforts and coordination of agencies such as Public Works Department, Local Self Government, Highway Authorities, Police, Health Department, Education Department, NGOs etc. shall be coordinate and synergized by taking up related activities throughout the year so that a large number of citizens are benefited.

**vii) Providing Emergency Medical Services for Road Accidents**

The Government recognizes that providing emergency medical services for road accident victims, especially in the "Golden Hour" is of utmost importance from the point view of saving life of a road accidents victim. Recognizing this, the Government has already commissioned State Emergency Medical Services as part of National Rural Health Mission

(NRHM) and has presently 937 ambulances covered by it. The services are available round the clock and operated through a central control room. As the response to the service is encouraging, the State intends to increase the fleet of ambulances as much as possible so as to provide immediate medical relief to road accidents victims.

**viii) Safety of Passengers**

The Government shall take direct and indirect measures to ensure safety of passengers/persons travelling in the vehicles, including those for women and school going children.

**ix) Implementation of Guide Lines and Orders regarding Air and Noise Pollution.**

Effective implementation of guidelines and orders regarding air and noise pollution issued by Pollution Control Board and Courts and statutory provisions to ensure compliance with air and noise pollution standards shall be ensured.

## III. Implementation Strategy

In order to effectively implement the State Road Safety Policy, the Government resolves to :-

i) Strengthen and activate the already set up dedicated apex agency i.e. State Road Safety Council under the Chairmanship of Minister (Transport).
ii) Enact and enforce a separate legislation titled "Maharashtra Transport Act".
iii) Establish a "State Road Safety Fund" to finance the road safety initiatives undertaken under this policy .

**महाराष्ट्र राज्याकरिता रस्ता सुरक्षा धोरण ठरविणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः एमव्हीआर-०६१५/प्र.क्र.२७१/परि-२**
मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग,
मुंबई- ४०० ०३२
तारीख: १४ ऑक्टोबर, २०१५.

**शासन निर्णय :**

केंद्र सरकारच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने रस्ते अपघातामुळे येणारे अपंगत्व आणि होणारे मृत्यू याचे प्रमाण कमी होण्याकरीता राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रीय रस्ता सुरक्षा धोरण तयार केले आहे. त्याचधर्तीवर सदर राष्ट्रीय रस्ता सुरक्षा धोरण विचारात घेऊन आणि राज्यातील रस्ते अपघातांवर उपायोजना करण्यासाठी सोबतच्या परिशिष्ट "अ" प्रमाणे "महाराष्ट्र राज्य रस्ता सुरक्षा धोरण" मान्य करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५१०१४१६२१४२४३२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Tikamdas N Shikharame
Digitally signed by Tikamdas N Shikharame
DN: CN = Tikamdas N Shikharame, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Section Officer
Date: 2015.10.16 13:51:34 +05'30'

**(टि. न. शिखरामे)**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) अ.मु.स./प्रधान सचिव/ सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२) अ.मु.स./प्रधान सचिव / सचिव, सार्वजनिक आरोग्य, विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
३) अ.मु.स./प्रधान सचिव/ सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
४) अ.मु.स./प्रधान सचिव/ सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
५) परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६) अपर पोलीस महासंचालक (वाहतुक) महाराष्ट्र राज्य, मुंबई
७) अपर परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८) उप परिवहन आयुक्त, (सर्व)
९) प्रादेशिक परिवहन अधिकारी (सर्व)
१०) उप प्रादेशिक परिवहन अधिकारी (सर्व)
११) कक्ष अधिकारी, कार्यासन पोल-८, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१२) निवडनस्ती परि-२

## परिशिष्ट "अ"

## महाराष्ट्र राज्य रस्ता सुरक्षा धोरण

### I. उद्देश

१. अलिकडील वर्षात राज्यात मोटार वाहनांमुळे होणारे रस्ते अपघातांची संख्या आणि त्यामुळे होणारी दुखापत आणि मृत्यू याबाबत शासन गंभीरपणे चिंता करीत आहे. रस्ते अपघातामुळे सार्वजनिक आरोग्याचे प्रश्न निर्माण झाले असून अपघातामध्ये प्रामुख्याने निष्पाप तसेच सहज बळी पडणारे अन्य यांचे बळी पडतात असे शासनास दिसून आले आहे.

२. रस्ते अपघातास कारणीभूत ठरणारे प्रमूख घटक निश्चित केले असून सदर घटक पुढीलप्रमाणे आहेत :-

i) अकुशल चालक

ii) अपात्र वाहने

iii) प्रभावी अंमलबजावणीची कमतरता

iv) रस्त्याची सदोष रचना / आराखडा

v) योग्य त्या उपाययोजना करण्यासाठी सर्व संबंधित शासन यंत्रणा व अन्य यंत्रणेमध्ये असलेला समन्वयाचा अभाव.

रस्ते अपघात कमी करणे, दुखापत तसेच मृत्यूहानी कमी करण्याची जबाबदारी ही सर्व संबंधीत घटकांची असल्याचेही दिसून आले आहे.

३. वरील बाबी विचारात घेता, रस्ता सुरक्षा धोरणाच्या माध्यमातून, रस्ते अपघातामुळे होणारी मृत्युंची संख्या व जीवितहानी मोठया प्रमाणात कमी करण्यासाठी वचनबद्ध असल्याचे शासन घोषित करीत आहे.

### II धोरणाचे निवेदन

रस्ता सुरक्षेमध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा होण्याच्या दृष्टिकोनातून, परिवहन विभाग, महाराष्ट्र शासन हे या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी सर्वोच्च समन्वयक संस्था म्हणून कार्य करेल. या धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी शासन पुढील बाबींसाठी वचनबद्ध आहे.

#### i. मोटार वाहन चालकाची गुणवत्ता आणि कौशल्य वाढविणे :-

भावी मोटार वाहन चालकांची सर्वांगीण वाहन चालविण्याच्या कौशल्याची खात्रीशिरपणे चाचणी घेता यावी याकरीता शासनाने सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट, पुणे येथील संगणकीकृत वाहन चाचणी पथावर चाचणी घेण्यास सुरुवात केली आहे. तशाच

प्रकारचे वाहन चाचणी पथ इतर ठिकाणी तयार करुन त्यावर वाहन चालकाची चाचणी घेण्यात यावी यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करेल. या उपाययोजनामुळे केवळ योग्य तेच कुशल चालक रस्त्यावर येतील व त्यामुळे रस्ते अपघात कमी होण्यास हातभार लागेल.

ii. **वाहनांच्या सुस्थितीबाबत योग्य चाचणी घेणे :-**

सुस्थितीत नसलेल्या वाहनाच्या वापरामुळे रस्ते अपघातात भर पडत असल्याची शासनास जाणीव आहे. या बाबीची दखल घेऊन शासनाने पुढाकार घेऊन या पुर्वीच परिवहन वाहनांच्या चाचणीकरीता स्वयंचलित वाहन चाचणी पथ नाशिक येथे उभारला आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक महसूली विभागात अशाच प्रकारचे केंद्र उभारण्याचे शासनाने योजले असून, यापुढे त्या क्षेत्रातील वाहनांची संख्या विचारात घेऊन केंद्रांची संख्या टप्प्या-टप्प्याने वाढविण्यात येईल. सद्यस्थितीत परिवहन वाहनांनाच योग्यता चाचणी लागू असली तरी याबाबतचा अनुभव लक्षात घेऊन, शासन तशाच प्रकारची चाचणी परिवहनेतर वाहनांना लागू करील. या उपाययोजनांमुळे निश्चितपणे वाहनांची योग्यता चाचणी पारदर्शक आणि काटेकोरपध्दतीने होईल व त्यामुळे रस्ते अपघात कमी होण्यास हातभार लागेल.

iii. **रस्त्यावर कायदेशीर तरतूदींची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे :-**

मोटार वाहन कायदा आणि त्या संबंधी इतर कायद्यातील तरतूदींची रस्त्यावर प्रभावीपणे अंमलबजावणी केल्यास त्याचा दीर्घकालीन परिणाम होऊन रस्ते अपघातांची संख्या कमी होते याची शासनांस जाणीव आहे. क्षमतेपेक्षा जास्त माल वाहून नेणे, मद्यपान करुन वाहन चालविणे, अतिवेगाने, बेजबाबदारपणे आणि निष्काळजीपणे वाहन चालविणे यामुळे रस्ते अपघात होतात असेही शासनास दिसून आले आहे. रस्ते अपघातास क्षमतेपेक्षा जास्त माल वाहून नेणाऱ्या वाहनांच्या तपासणी करिता शासनाने आतापर्यंत राज्यात ९ ठिकाणी अत्याधुनिक सीमा तपासणी नाके उभारले असून डिसेंबर २०१५ पर्यंत उर्वरीत १३ नाक्यांचे आधुनिकीकरण करण्याचे योजीले आहे.

मद्यपान करुन वाहन चालविणे, अतिवेगाने, बेजबाबदारपणे आणि निष्काळजीपणे वाहन चालविणे यासारख्या घटना लक्षणीयरित्या कमी होण्याच्या दृष्टीने, अंमलबजावणी यंत्रणांना अधिक कार्यक्षम करण्यासाठी, अत्याधुनिक उपकरणे पुरविणे, त्यांची क्षमता वाढविणे, त्यांना पायाभूत सोयीसुविधा पुरविणे शासनाने योजिले आहे.

iv. **रस्त्यांचे योग्य आराखडे आणि पायाभूत सुविधा :**

रस्त्याचा अयोग्य आणि चूकीचा आराखडा आणि अपुऱ्या पायाभूत सुविधा यामुळे रस्ते अपघात होतात याची शासनास जाणीव आहे.

सदर बाब विचारात घेऊन रस्त्याची रचना, बांधणी आणि देखभाल करणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था आणि महामार्ग प्राधिकरणे यासारख्या सहभागी यंत्रणांमध्ये परिवहन विभाग समन्वय ठेवून नियमितपणे निरीक्षण करेल. रस्त्यांवर पुरेश्या संख्येने चिन्हांचे फलक लावणेबाबत सुनिश्चिती करेल, तसेच आवश्यक तेथे सुधारणांबाबत उपाययोजना करेल. सुरक्षित व कार्यक्षम वाहतूकीसाठी शासन ' इंटिलीजेन्ट ट्रान्सपोर्ट सिस्टीम ' च्या अंमलबजावणीचा प्रयत्न करील.

या उपाययोजनेमुळे खात्रीशीरपणे रस्त्यांचे आराखडे योग्य पध्दतीने तयार केले जातील रस्त्यांची योग्यप्रकारे देखभाल केली जाईल तसेच रस्त्यांवर वाहतूकीची चिन्हे उभारले जातील व अशाप्रकारे रस्त्यावरील अपघात कमी होतील.

**v. रस्ता सुरक्षेबाबत जनजागृती करणे.**

अनेक वेळा पादचाऱ्यांच्या बेजबाबदार वर्तनामुळे रस्ते अपघात होतात असे शासनाचे निर्दशनांस आले आहे. पादचाऱ्यांनी तसेच रस्त्यांचा वापर करणाऱ्या इतरांनी रस्त्यावरील मुलभूत शिस्त पाळणे गरजेचे असलेबाबत सदर घटकांमध्ये जागृती निर्माण करणे आवश्यक असल्याची शासनांस जाणीव आहे. याबाबत संवेदनशील असणे आवश्यक आहे.

पादचारी आणि रस्त्याचा वापर करणाऱ्या इतरांना रस्त्यावरील शिस्तीचे पालन करण्याबाबत प्रशिक्षित करण्याकरिता शासन संपूर्ण राज्यात माहिती व जनसंपर्क विभाग, प्राथमिक शिक्षण विभाग आणि बिगर शासकीय संस्थांच्या माध्यमातून कायमस्वरुपी मोहिमा राबवेल व दृकश्राव्य, चित्रफित, वर्तमानपत्रे यांच्या माध्यमातून जनजागृती करेल.

शाळा तसेच कॉलेजचे विद्यार्थी जे रस्त्याचा वापर करणारे भविष्यात संभाव्य वाहन चालक होणार आहेत त्यांच्या मनात रस्ता सुरक्षा हा विषय खोलवर बिंबवणे आणि रुजविणे अत्यावश्यक असल्याची शासनांस जाणीव आहे. त्यामुळे सदर बाब शालेय अभ्यासक्रमामध्ये अनिवार्य करण्याचे शासन प्रस्तावित करीत आहे.

**vi. रस्ता सुरक्षेचे ध्येय गाठण्यासाठी शासकीय विभाग तसेच इतर संस्था / बिगर सरकारी संस्थाच्या सामुहिक प्रयत्नांची आवश्यकता.**

शासन जाणून आहे की, रस्ता सुरक्षा विषय हा लहान मुलांपासून वयोवृध्दांपर्यंत प्रत्येकाला स्पर्श करणारा आहे. याबाबत काम करणाऱ्या वेगवेगळया यंत्रणा अनेकवेळा स्वतंत्रपणे काम करतात.

सार्वजनिक बांधकाम विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था, महामार्ग प्राधिकरणे, पोलीस, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, बिगर सरकारी संस्था इत्यादींमध्ये संपूर्ण उपक्रम राबविण्याच्या दृष्टिने समन्वय ठेवला जाईल ज्यामुळे जनतेला याचा जास्तीत जास्त लाभ होईल.

vii. **रस्ते अपघाताकरिता अत्यावश्यक वैद्यकीय सुविधा पुरविणे.**

रस्ते अपघातांमधील व्यक्तींचे जीव वाचविण्यासाठी वैद्यकीय सुविधा पुरविणे, विशेष करुन "गोल्डन अवर " मध्ये अशी सुविधा पुरविणे याचे महत्व शासन जाणून आहे. सदर बाब विचारात घेऊन शासनाने या पूर्वीच राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशनचा भाग म्हणून "राज्य अत्यावश्यक वैद्यकीय सेवा" कार्यन्वित केली आहे. यामध्ये सध्या ९३७ रुग्णवाहिकांचा समावेश आहे. ही सेवा रात्रंदिवस उपलब्ध असून ती केंद्रीय नियंत्रण कक्षातून चालविण्यात येते. सदर सेवेला मिळणारा प्रतिसाद हा प्रोत्साहित करणारा असून या सेवेमध्ये रुग्णवाहिकांची संख्या जास्तीत-जास्त वाढविण्यासाठी शासनाचा मानस आहे जेणे करुन रस्ते अपघातामधील बळींना तात्काळ वैद्यकीय मदत मिळू शकेल.

viii) **प्रवाशांची सुरक्षितता.**

वाहनांमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची, जनतेची तसेच महिला आणि शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी शासन प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे उपाय योजना करेल.

ix) **वायु आणि ध्वनी प्रदुषणासंबंधी मार्गदर्शक सूचना आणि आदेशाची अंमलबजावणी.**

वायु प्रदुषण मंडळ, न्यायालय यांनी वायु आणि ध्वनीप्रदुषणासंबंधी जारी केलेल्या मार्गदर्शक सूचना आणि आदेशांन्वये प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यात येईल.

**III) अंमलबजावणी विषयी धोरण.**

राज्य रस्ता सुरक्षा धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासन पुढीलप्रमाणे करण्याचे योजिले आहे.

i) मंत्री (परिवहन) यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेली सर्वोच्च यंत्रणा म्हणजे "राज्य रस्ता सुरक्षा परिषद " यास अधिक सक्षमतेने कार्यान्वित करण्यात येईल.

ii) " महाराष्ट्र परिवहन कायदा " या नावाचा स्वतंत्र कायदा पारित करुन लागू करण्यात येईल.

iii) या धोरणांतर्गत हाती घेण्यात आलेल्या रस्ता सुरक्षा कार्यक्रमांना वित्त पुरवठा करण्यासाठी "राज्य रस्ता सुरक्षा निधी" ची स्थापना करण्यात येईल.

Tikamdas N Shikharame
Digitally signed by Tikamdas N Shikharame
DN: CN = Tikamdas N Shikharame, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Section Officer
Date: 2015.10.16 13:52:18 +05'30'

( टि. न. शिखरामे )
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन